भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.

दिनांक –२२/०५/२०१९.

- प्रेसनोट –

## सच्चाईमाता टेकडी वरिल सावकार/ईस्टेट एंजेन्टच्या खुनाचा गुन्हा उघड

---

दिंनाक.२०/०५/२०१९ रोजी सच्चाईमाता मंदिराच्या जवळील वाघजाईनगर भागात शांती निवास फार्म हाऊसवर ईस्टेट एंजेन्ट अजयकुमार सिताराम जैस्वाल, वय ४४ वर्षे, रा. प्लॅट नं. एच-११ हिमालय सोसायटी, कोथरुड, पुणे यांना धारदार शस्त्राने डोक्यात व तोंडावर वार करुन फार्म हाऊसला बाहेरुन कुलूपे लावुन निर्घून खुन करुन करण्यात आला होता. त्याबाबत भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे शहर येथे गुरन.३७१/२०१९ भादवि कलम.३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर मयत अजयकुमार सिताराम जैस्वाल यांचा खुन हा कोणी केला असावा याबाबत विविध शक्यता गृहित धरुन वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मागदर्शना खाली भारती विदयापीठ पोलीस ठाणे कडील दोन पथके नेमण्यात आली होती. त्यापैकी सहा. पोलीस निरीक्षक नलवडे यांच्या पथकामधील पोलीस कर्मचारी कुंदन शिंदे आणि गणेश चिंचकर यांना त्याच्या खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदरचा खुन हा १. विनायक उर्फ चिंटु कुमार कुर्तकोटी, वय २६ वर्षे, रा. प्लॅट नं.१४,१५, बिल्डींग नंबर ३,४, एस. एन. डी.टी. कॉलेज जवळ, कर्वेरोड, मेगा सिटी, पुणे २. अविनाश दिपक जाधव, वय २१ वर्षे, रा. प्लॅट नं.१४,१५, बिल्डींग नंबर १,२, एस. एन. डी. कॉलेज जवळ, कर्वेरोड, मेगा सिटी, पुणे यांनी केला आहे. सदर आरोपी हे चांदणी चौक, कोथरुड जवळील जंगलात लपुन बसले आहेत. सदर बातमीची खातरजमा करुन वरिष्ठाच्या मागदर्शना खाली सापळा लावुन सदर आरोपी दि.२१/०५/२०१९ रोजी ताब्यात घेवुन, पोलीस ठाणेस आणुन, विश्वासात घेवुन कौशल्यापुर्व रितीने विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, विनायक उर्फ चिंटु कुमार कुर्तकोटी हा पुर्वी अजय जैस्वाल यांच्याकडे ऑफिस बॉय म्हणुन काम करत होता. त्यांच्याकडे काम करत असताना त्यांना व्याजाने पैश्याची आवश्यकता असणारे ग्राहक शोधुन देत असत. त्याबदल्यात ते त्याला कमिशन देत होता. परंतु काही दिवसापुर्वी पासुन मयत अजय जैस्वाल यांनी ग्राहकाच्या बदल्यात कमिशन दिले नव्हते. सदर कमिशनचे पैसे देण्यास ते नकार देत होते. तसेच विनायक उर्फ चिंटु याच्या बहिणीचा घटस्फोटाचा दावा चालु आहे. ती विनायक उर्फ चिंटु यांच्याकडे राहत असल्याबाबत मयत अजयकुमार सिताराम जैस्वाल, याला माहिती असल्याने तो विनायक उर्फ चिंटु यास बहिणीला त्याच्याकडे काम करण्यासाठी पाठवुन दे असे वाईट हेतुने वारंवार म्हणत होता. त्याचा राग मनात धरुन त्याने अजय जैस्वाल याचा खुन करण्याचे ठरविले. मयत जैस्वाल हा त्रास देत असल्याबाबत त्याचा मित्र अविनाश दिपक जाधव याला सांगुन दोघांनी मिळुन मयताच्या डोक्यात, तोंडावर कोयत्याने व चॉपरने वार करुन खुन केला. त्यांनतर फार्म हाऊसला बाहेरुन कुलूप लावुन ते पळुन गेले. अशप्रकारे त्यांनी गुन्हयाची कबुली दिल्याने त्यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा करण्यासाठी आरोपीना आणखीन कोणी प्रवृत्त केले आहे का ? किंवा मदत केली आहे का ? याबाबत पुढील सखोल तपास मा. पोलीस निरीक्षक गुन्हे श्री विष्णु ताम्हाणे हे करित आहे.

सदर कामगिरी अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग श्री रविंद्र सेंनगावकर, परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री बच्चनसिंग सो, सहा. पोलीस आयुक्त श्री नांदेडकर सो यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णु पवार, पोलीस निरीक्षक(गुन्हे) विष्णु ताम्हाणे, तसेच तपास पथकाचे सहा. पोलीस निरिक्षक प्रमोद नलवडे, पोलीस उप निरीक्षक श्री शक्तिसिंह खानविलकर, पोलीस कर्मचारी कृष्णा बढे, कुंदन शिदे, गणेश चिचंकर, सर्फराज देशमुख, सचिन पवार, महेश मंडलीक, राहुल तांबे, सिध्देश्वर पळसे, श्रीधर पाटील, अभिजीत रत्नपारखी, समीर बक्षिराज यांनी केलेली आहे.

पोलीस निरीक्षक (गुन्हे)

भारती विदयापीठ पोलीस ठाणे,पुणे.